" Social Transformation Through Dynamic Education "
Bharati Vidyapeeth's
**Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli**
(Affiliated to Shivaji University)
P.O.Box.No. 74, Sangli-416 416 Ph.: 0233-2535229, Fax: 2535993
E-mail: bvpkc_sangli@yahoo.co.in, dgkanase@gmail.com
web-site: www.dpkmsangli.bharatividyapeeth.edu

Founder :
Dr. Patangrao Kadam
M.A., LL.B., Ph.D.
Principal
Dr. D. G. Kanase
M. Sc., Ph. D.

celebrating
'A' Grade Accredited by NAAC, Banglore

Ref.No.:BV/PKMS/ /20 -20

Date:29 / 02/2022

# REPORT

## WEBINAR ON 'EMERGING HORIZONS IN MARATHI LITERATURE'

Bharati Vidyapeeth's Dr. Patangrao Kadam College Sangli in joint venture with Shivaji University Marathi Teacher's Organization conducted webinar on **'EMERGING HORIZONS IN MARATHI LITERATURE'**. The webinar was conducted on **28th February 2022**. The eve was chaired by Principal Dr. D.G.Kanase. The speaker Prof. Dr. Randhir Shinde, Head Department of Marathi, Shivaji University Kolhapur delivered the key note lecture and unfolded various aspects of emerging horizons in Marathi literature. "Discrimination on the basis of language is non scientific act which leads to subsequent social discrimination", was told by him. Language should not be confined to specific celebration day and it is integral part of pour life. It should be explored through scientific attitude. Language has deep impact on social interactions and growth of the society was reiterated by him.

Dr. D.G.Kanase told in his presidential address that, 'Regional Encroachments in India had deep impact on the languages and irrespective of this Marathi literature has retained its existence. Society need to protect this was urged by him.

Preamble of the program was by Dr. Krushna Bhawari. The program was anchored and concluded by Dr. Mrs. Shilpa Salunkhe.

Dr. Krushna Bhawari.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA • SANGLI • BHARATI VIDYAPEETH PUNE

Dr. D.G.Kanase
Principal,
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Sangli.

भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली
व
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेले व्याख्यान

## अहवाल

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ फेबुवारी २०२२ रोजी ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले होते. प्रा. डॉ. रणधीर शिंदे (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांनी **'मराठी भाषा : उपयोजित क्षेत्रे'** या विषयावर व्याख्यान दिले. भाषाभेद करणे ही अत्यंत चुकीची आणि अवैज्ञानिक स्वरूपाची गोष्ट आहे. व्यक्ती भाषाभेदातूनच समाज भेदभावाकडे वाटचाल करत असतो. भाषा ही श्रेष्ठ-कनिष्ठ कधीच नसते. ती चिन्हांकित असते. भाषेकडे वस्तुनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. भाषा ही केवळ विशिष्ट दिनानिमित्त स्मरण करण्याची बाब नाही, तर तो आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून ज्या भाषेच्या पर्यावरणात आपण जगतो, वाढतो, घडतो, ज्याचे भरण-पोषण होत राहते ते कायमस्वरूपी आपल्या विवेकबुद्धीने जतन करण्याची गरज आहे असे मार्गदर्शन त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, 'आपल्या देशावर परकीयांची अनेक आक्रमणे झाली. त्याचा परिणाम मराठी भाषेवर झाल्याचे दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानातही मराठी भाषेने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. आपण सर्वांनी मिळून मातृभाषेचे संवर्धन करणे गरजेचे आहे.' असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

महाविद्यालयातील विदयार्थ्यांना मराठी भाषा आणि साहित्याची आवड निर्माण व्हावी, त्यांना लेखन, वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात हे विशेष व्याख्यान ऑनलाईन पद्धतीने आयोजित केले होते. या व्याख्यानाचा लाभ महाविद्यालयातील अनेक विदयार्थ्यांना आणि प्राध्यापकांना झाला. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. कृष्णा भवारी यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. सौ. शिल्पा साळुंखे यानी केले तर आभार प्रा. अक्षय खडतरे यांनी मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA • SANGLI • BHARATI VIDYAPEETH PUNE

प्राचार्य,
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली




Dr. Krushna Bhawari.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA • SANGLI •
BHARATI VIDYAPEETH PUNE

Dr. D.G.Kanase
Principal,
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Sangli.